# राशिभविष्य - जुलै, २०१३.

**दादा दामले**(dadadamle@gmail.com)

===============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ बराचसा प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना केवळ महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, साहित्यिक, ग्रंथबिक्रेते अशा सर्वांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना काळ लाभदायक होईल. पण या राशीच्या मंडळीना हर्षल, शनि, राहू पूर्णपणे व रवि केवळ महिन्याच्या उत्तरार्धातच प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे आर्थिक चिंता निर्माण होणे, कौटुंबिक सुख व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. तसेच भावंडाभावंडांत कलह निर्माण होणेही संभवते. जपा. दांपत्यजीवनातही कोणाच्या तरी अनारोग्यामुळे किंवा अन्य कारणांनी वैवाहिक जीननातील सुखात बाधा येणे संभवते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने प्रतिकुल परिस्थिती हद्दीबाहेर जाणार नाही. आर्थिक समस्या वा आर्थिक घोटाळे निर्माण झाल्यास  वाम मार्गाकडे मन व बुद्धीचा ओढा होईल. येथे आवर्जून सांगावेसे वाटते की कुसंगतीचा - कुमार्गी मित्रांचा - प्रभाव या राशीच्या मंडळीवर पडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे नको त्या विचारांचा प्रभाव मन व बुद्धीवर झाल्यास हातून नको ते घडेल व वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळेल जपा. वाममार्ग धनप्राप्तीचा मोहही गोत्यात आणील. जपा.  पण शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल.विचारांच्या तंद्रीत वाहन चालवू नका. अपघात भय संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव या महिन्याच्या काळात अतिशय लहरी होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळ हे दोन  ग्रह प्रतिकुल असल्यामुळे अनारोग्यकारक होतील व उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना नेत्रविकाराचा तर काहीना घसा, दात, मान यापैकी कसल्या तरी आजाराचा त्रास सहन करावा लागेल. तसेच आर्थिक समस्या दूर व्हावी यासाठी केलेल्या धडपडीमुळेही शारीरिक-मानसिक थकावट जाणवेल. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. व आर्थिक समस्येची चिंता दूर होईलसे दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक ठरेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-गाहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरीत कर्तृत्व सिद्ध करणारांना विविध प्रकारचे लाभ होतील. शेतीवाडीपासून अपेक्षेपेक्षा अधिक लाभ होतील. गृहसौख्य लाभेल. पण मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. मानसिक रोग तज्न्य व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना तसेच परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. दिनांक १६-१७ हे दोन दिवस मन अस्वस्थ राहीलसे दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी शारीरिक-मानसिक आरोग्यसंपन्न राहणे जरूरीचे होईल. वैवाहिक जीवनात अकारण वाद,

मतभेद होणे संभवते. जपा. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळेही मन अस्वस्थ राहील. श्रद्धा असेल तर श्रीगजानन उपासना अनुकुल होईल. तसेच दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ हे दोन्ही ग्रह शारीरिक, मानसिक दृष्ट्या अनारोग्यकारकच होणार आहेत. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळाशी मुकाबला करणेच सुखाचे होईल. हट्टी स्वभाव, विकृत मन व बुद्धी अकारण श्रम दगदग करावयास भाग पाडील. त्यामुळे शरीरपीडा होऊन थकावट जाणवेल. जपा. हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. सामान्य नोकरी असणारांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. अन्य शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनाही पतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. अनपेक्षित खर्च उपटण्याची दाट शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नेत्रविकार बळावण्याची शक्यता दिसते. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बौद्धिक, शैक्षणिक, संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना व साहित्यिकांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना मानाचे, अधिकाराचे स्थान मिळू शकेल. शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्यापारीमंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. शनि-राहूमुळे संततिसुखात व गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. जपा. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. बुध-मंगळामुळे कुसंगतीचा स्पर्श झाला तर नुकसान होणारच. जपा. पण गुरु-नेपच्यून शुभ योग असल्यामुळे अध्यात्माकडे मन व बुद्धी वळवून इष्ट देवतेची उपासना केल्यास मन:शांती लाभेल. प्रवासाचे योग संभवतात. काही मंडळीना परदेशगमनाचे योगही येतील. श्रीगुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात सतत मनाविरुद्ध व मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असल्याचा अनुभव येईल. रवि-मंगळ-शनि-राहू हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत आर्थिक चिंता, अस्वस्थ मन, भांडणे, गैरसमजुती, मानहानी, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येऊन सर्व प्रकारचे आरोग्य बिघडू शकेल. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " ह्या तुकोबाच्या वचनावर श्रद्धा ठेवून व प्रिय दैवताच्या उपासनेवर भर देऊन नम्रतेने आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल व शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने सुखशांती समाधान मिळवू शकाल. रक्तदाब व हृदयविकार असणारांनी तर विशेष प्रयत्नानी मन व विचार शांत ठेवले पाहिजेत. तरच अनारोग्यावर मात करू शकाल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक जीवनात मनोनुकुल घटना घडतील. काहींना धनलाभही होणे संभवते. काही मंडळीना राहत्या जागेविषयीची समस्या, काहींना स्थावरसंबंधी समस्या, तर काही मंडळीना कौटुंबिक जीवनात घडणाऱ्या अनिष्ट घटाना त्रस्त करतील व त्यामुळे गृहसौख्यात बाधा निर्माण होईल. जपा. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी सतत सावधानतेनेच आचरण करावे. जलभय, विषभय संभवते. या राशीच्या युवकांनी सध्या नवे काही करण्याचा प्रयत्नही करू नये. आहे ती नोकरीच प्रामाणिकपणे करावी. पण शास्त्रीय संशोधन व

गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना मात्र या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायी ठरेल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योगही संभवतात.

**(५) सिंह -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणार आहे. म्हणून त्यांनी जे काही साधावयाची तीव्र इच्छा आहे ते साध्य करण्यासाठी महिन्याच्या पूर्वार्धातच अटोकाट प्रयत्न करावा. कारण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह प्रतिकुल होत असल्यामुळे अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने मनोकामना पूर्ण होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच नवे मित्र मिळतील; पण जुन्या मैत्रीत वितुष्ट येणार नाही, याची काळजी घ्या. काही मंडळीना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणेही शक्य आहे. सामान्य नोकरदार मंडळीना गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने पण कष्ट-परिश्रमानेच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुख-समाधान लाभेल. या राशीच्या काही युवकांना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल; तर काहींना मनासारखी उत्तम नोकरी मिळू शकेल. मात्र दिनांक ११-१२ या दोन दिवशी सावधानतेनेच आचरण करा. भावंडविषयक समस्या त्रस्त करील. तसेच काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यासंबंधीचा त्रास होणे संभवते. स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य काही कारणाने दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच अपेक्षित संततिसुखातही कमतरता अनुभवास येईल. पण शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील. या राशीच्या अष्टम स्थानी हर्षल हा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे सतत सावधानतेनेच आचरण करा. अपघातभय संभवते. श्रद्धेने नियमितपणे रामरक्षास्तोत्र व हनुमानचालिसास्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात नैराश्यामुळे किंवा काल्पनिक चिंतांमुळे उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याचे वाटू लगेल. काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा असल्यामुळे असा त्रास होत असावा. मन खंबीर करा, सहनशील व्हा, आणि मनावर ताबा ठेवून विचारपूर्वक आचरण करत प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. "रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल " ही काव्यपंक्ती सतत ध्यानात ठेवून वाटचाल करा. तुमच्या जीवनात लवकरच उष:काल होणार आहे याची खात्री बाळगा. या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना आपल्या इच्छाआकांक्षा पूर्ण करता येणे शक्य होईल. योग्यतेनुसार व कर्तृत्वानुसार विविध प्रकारचे लाभ होतील. अर्थलाभ होईल. "देता किती घेशिल दो करांनी" असा काळ असला तरी बुद्धी विकृत होणार नाही याची आवर्जून काळजी घ्या. नपेक्षा "दैव देते, कर्म नेते " अशी अवस्था होणे संभवते. जपा. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, शास्त्रीय संशोधनक्षेत्र, औषधविक्रेते, शल्यचिकित्सक अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. इतरांना कामाचा ताण व वरिष्ठांचा विरोध सहन करतच प्रतिकुल काळाशी मुकाबला करावा लागेल. मतभेदांमुळे, भांडणांमुळे किंवा जीवनसाथीच्या विक्षिप्त आचरणामुळे दांपत्यजीवनातील सुखसमाधानात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. तसेच कुटुंबात काही अनिष्ट घटना घडल्यास कौटुंबिक सुख व गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. पण शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. आरोग्याचे बाबतीत काही

मंडळीना त्वचाविकार, काहींना रक्तविकार तर काहींना मुख-दंतविकारापैकी कसला तरी आजार होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजानन उपासना आणि शिवोपासना अनुकुल होतील.

**(७) तुळा -** तुलनात्मक दृष्ट्या या राशीच्या मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व सुखावह होईलसे दिसते. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या सर्वांनाच प्रतिकुल असल्यामुळे या काळात उगीच धडपड न करता महिन्याच्या उत्तरार्धातील अनुकुल काळात साधावयाच्या गोष्टींची पूर्वतयारी करण्यात काळ व्यतीत करा. मन व विचारबुद्धी विकृत होणार नाही, याची काळजी घ्या. तरच गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे मन व बुद्धी अध्यात्म साधनेस व गूढत्वाच्या संशोधनास अनुकुल होईल. श्रद्धापूर्वक आध्यात्मिक उपासनेत व चिंतनात काळ व्यतीत करा. त्यामुळे मन:शक्ती वाढून आत्मविश्वास निर्माण होईल व शास्त्रीय संशोधनास आणि महिन्याच्या उत्तरार्धातील अनुकुल काळात साध्य करावयाच्या गोष्टींसाठी दिशा प्राप्त होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना व स्वतंत्र व्यापार-व्यवसाय आणि कला-कार्यक्षेत्र असणारांना महिन्याच्या उत्तरार्धातच योगायोगाने किंवा  थोरामोठ्यांच्या ओळखीने विविध प्रकारचे लाभ प्राप्त होतील. मात्र त्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. अकारण अति विचार केल्यास डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागेल. तसेच मुदतीचा ताप येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. शारीरिक आजाऱ्पेक्षा असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांचाच अधिक त्रास या राशीच्या मंडळीना  सहन करावा लागेलसे दिसते. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच घरातील प्रिय जनांपैकी कोणाच्या स्थलांतरामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. शक्यतो प्रवास करू नका. श्रद्धा असेल तर श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल. नियमितपणे दररोज हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असाच असणार आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांनी भांबावून न जाता मन व बुद्धी शांत, स्थिर राखून अत्यंत सावधानतेने आचरण करावे. त्यामुळेच हा विपरीत काळ सुसह्य होईल. कसल्याही प्रलोभनाला  बळी पडू नका. आर्थिक व्यवहार अत्यंत सावधानपूर्वकच व फ़सवणूक होणार नाही, याची खात्री करूनच करा. नवीन काही सुरू करण्याचा विचारही करू नका. तुमच्याविषयी अकारण गैरसमज होणार नाहीत, याची काळजी घ्या. कोर्ट प्रकरणे होणार नाहीत, याची काळजी घ्या. सर्व प्रकारच्या अपघातांपासून जपा. असे आचरण केलेत तरच सर्व प्रकारचे आरोग्य ठीक राहू शकेल व छुप्या शत्रूंपासून रक्षण होईल. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार बळावतील. नोकरीत वरिष्ठांशी नम्रतेनेच वागा. काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा आहे याची जाणीव ठेवूनच योग्य असे आचरण केल्यास सर्व सुखाचेच होईल. काळ विपरीत असला तरी या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत धनलाभ योग असतील तर त्यांना असा अचानक धनलाभ वा  वारसा हक्काने धनलाभ मिळणे संभवते.  तसेच काही मंडळीना  परदेशगमनाची  संधीही मिळेल. या राशीच्या ज्या

विद्यार्थ्यांची उच्च शास्त्रीय संशोधनात्मक शिक्षणशाखा असेल त्यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधूनमधून दिलासा देणाऱ्या घटना घडतील. पण उत्तरार्धात कोणत्याच ग्रहाची म्हणावी तशी अनुकुलता लाभणार नाही. दांपत्यजीवनात

दोघांपैकी कोणाच्या आजारपणामुळे किंवा गैरसमज, मतभेद अशा कारणांनी वैवाहिक जीवनात अपेक्षित सुखसमाधान लाभेलसे दिसत नाही. श्रीगजाननाची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ वैवाहिक जीवन, कौटुंबिक सुख, संततिसुख या दृष्टीने फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. अध्यात्माची मनापासून ओढ असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती लाभू शकेल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेलसे दिसते. ताप येणे, अपचन होणे, पोटविकारांचा, मूत्राशयविकाराचा अशापैकी कसला तरी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय दांपत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील मतभेद, वाद यांमुळे मनस्ताप होणे संभवते. जपा. काही कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल, त्यांनी भागीदारी तुटणार नाही यासाठी विशेष जपावे. मन सध्या अतिशय भावनाशील होणार असल्याने सतत अस्वस्थ राहील, व त्यामुळे काही केले तरी सुखसमाधान लाभणार नाही. अस्वस्थ मन, अनारोग्य, कुसंगती अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे शक्य आहे. जपा. अशा विपरीत परिस्थितीतही गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे महिन्याच्या उत्तरार्धात मनोनुकुल घटना घडतील व मनावरील ताण हलका होईल. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह होतील. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येतील. गुरुकृपा, थोरकृपा अशापैकी काही तरी प्राप्त होईल व काही मंडळीना प्रसिद्धी मिळू शकेल. विविध प्रकारचे लाभ होतील. वकिली व्यवसाय, कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना काल अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. मात्र या राशीच्या ज्या मंडळीना सहज वाममार्ग धन मिळण्याची शक्यता आहे, त्यांनी त्या मोहापासून दूर राहावे. अध्यात्म, गूढ संशोधन अशा कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर गुरुदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनी नोकरीतील प्रगती व अन्य लाभदायक गोष्टींसाठी महिन्याच्या पूर्वार्धातच अधिक प्रयत्न करावा. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय, औषधविक्रेते, वकिली, सल्लागारी व्यवसाय, लोखंडी सामानाचे व्यापारी, कोळसा व्यापारी अशा सर्वांना, तसेच बौद्धिक, शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र या राशीच्या सर्वांनीच या महिन्याच्या दिनांक १६-१७ या दोन दिवशी अत्यंत सावधानतेनेच आचरण करावे. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक-मानसिक आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेलसे दिसते. इजा होणे, उष्णताविकार, हृदयविकार, रक्तविकार बळावणे, अशापैकी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील. तसेच फ़सवणूक, चोरी अशामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यताही जाणवते. जपा. दांपत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे, मतभेद यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. कुसंगतीची बाधाही याच काळात होणे संभवते. पण अष्टम स्थानी शुक्र ग्रहाच्या आगमनाने कमी-अधिक प्रमाणात या राशीच्या सर्वांनाच मनोनुकुल घटनांचा आस्वाद

घेता येईलसे दिसते. उच्च बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रगतिकारक असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशवारीची संधीही मिळू शकेल. कौटुंबिक जीवनात गैरसमज व न पटवून घेण्याची वृत्ती बळावल्यास कौटुंबिक व गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींच्या मानसिक संवेदना सध्या अति शीघ्र झाल्या असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे थोडेही मनाविरुद्ध काही घडले तरी मन उदास होऊन लगेच गहरे नैराश्य येत असावे. अशा परिस्थितीत हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह वाचा स्थानी असल्यामुळे तर स्वभाव अत्यंत चंचल, लहरी, अस्थिर झाल्यास अविचाराने खर्च होणे संभवते. जपा. जिभेला लगाम घाला; नपेक्षा अकारण इतरांची मने दुखावली जातील. स्वत:च्या आचरणावर नियंत्रण ठेवा. या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल होणार आहे. महिन्याच्या प्रथमार्धात नोकरीत त्रास सहन करावा लागेल. घरातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूर जाणे झाल्यास मन अस्वस्थ होईल. मुलांपैकी कोणाच्या आजारपणामुळे, कोणाच्या विक्षिप्त  आचरणामुळे संततिसुखात बाधा येऊ शकेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शुक्र ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे जीवनसाथीचे आजारपण, व कुसंगतीत मन अडकले तर धननाश होणेही संभवते. तसेच वैवाहिक जीवनातही कटकटी निर्माण होतील. राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते  यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री=ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. मन शांत व संयमित राखून, तसेच शारीरिक आरोग्य उत्तम राखता आले तरच या राशीचे विद्यार्थी शिक्षणात प्रगती करू शकतील. आध्यात्मिक उपासनेकडे मन वळविल्यास मन:शांती लाभेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. .

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यात सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी असाच असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी आर्थिक व्यवहार जपून सावधानतेनेच करावेत. नपेक्षा फ़सवणूक होऊन मानहानी होणे संभवते. दिनांक २६-२७ या दोन दिवशी विशेष सावधानीने सर्व व्यवहार करावेत. नोकरदार मंडळीना नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे स्वत:चे शारीरिक, मानसिक आरोग्य बिघडेल. जपा. प्रिय जनांमध्ये दूरत्व आल्यामुळेही काही मंडळीना असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. कौटुंबिक जीवनात गैरसमज, भांडणे, असमाधानकारक घटना, वितुष्ट येणे, राहत्या जागेची समस्या, स्थावर संपत्ती समस्या अशापैकी कारणांनी  कौटुंबिक सुख व गृहसौख्य यात बाधा येऊ शकेल. जपा. अशा विपरीत परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काळ अनुकुल नसल्यामुळे या राशीच्या मंडळीनी नवीन असे काही करण्याचा विचारही करू नये. पण मन व बुद्धी स्थिर राखण्याचा प्रयत्न

करून भावी अनुकुल काळात पार पाडावयाच्या योजनांची पूर्वतयारी करून ठेवण्यास हरकत नाही. या राशीच्या काही मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी कटाक्षाने तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळीना व गुप्त पोलीसखात्यातील मंडळीना काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपण "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====00000=====